सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती
Email roamravati.dte@gmail.com, ati_jdroamt@sancharnet.in Web: www.jdroamt.org
Phone :- ०७२१- २५७ ३०२७, २५७२५७७ Fax :- ०७२१ - २५५१३८८

**फॅक्सव्दारे** /महत्वाचे

क्रमांक :- विकाअ/आस्था/EMIS /२००९/ ८१७
दिनांक :- २६/३/०९

**प्रति,**

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, अमरावती.
शा. औ. नि. शास्त्र महाविदयालय, अमरावती.
प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, अमरावती/खामगांव/
वाशिम/यवतमाळ/ शा. निवासी महिला तंत्र निकेतन, यवतमाळ.

**विषयः- तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय आस्थापनेवार कार्यरत अधिकारी/कर्मचा-यांची माहिती संगणकीय करणे बाबत. . .**
**संदर्भः- संचालक तंत्र शिक्षण, म. रा. मुंबई यांचे पत्र क्र. ४/आस्था/२००९/७६५ दि. २६ मार्च २००९**

उपरोक्त विषयाबाबतचे संचालक तंत्र शिक्षण, म. रा. मुंबई यांचे संदर्भीय पत्रान्वये मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या आदेशानुसार संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्था/कार्यालयातील अधिकारी /कर्मचा-यांची माहिती संगणकीय करण्यासाठी EMIS ही संगणक प्रणालीवर ऑन लाईन माहिती भरण्यासाठी या कार्यालयाव्दारे यापुर्वीच सुचीत करण्यात आलेले आहे.

त्यानुसार या कार्यालयांतर्गत शासकीय संस्थांनी ऑनलाईन भरलेल्या माहितीचे संचालनालय स्तरावर प्राथमिक तपासणी करतांना असे आढळून आले की, संचालनालयाकडील उपलब्ध अभिलेख व ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आलेल्या काही माहितीमध्ये तफावत आढळून आली असून काही माहितीच्या शिर्षाची माहिती आतापर्यत भरलेलीच नाही. करीता आपले संस्थेची माहिती ऑनलाईन पध्दतीने भरताना संबंधीत कागदपत्रे व संबंधीतांची सेवापुस्तके बघून माहिती दिनांक ३०.३.२००९ पर्यंत अचूक भरावी. तसेच सदरहू माहितीच्या आधारावर शासन तथा संचालनालयाकडून काही धोरणात्मक निर्णय होणार असल्याने सदर माहिती चुकीची असल्यास त्याचा विपरीत परिणाम धोरणात्मक निर्णयावर होईल, म्हणून आपले संस्थेने भरलेली माहिती बिनचुक असल्याचे प्रमाणित करण्यात यावे.

असेही नमूद करण्यात येते की, या बाबत मा. प्रधान सचिवांनी EMIS या संगणक प्रणालीवर दिनांक १.४.२००९ पर्यंत संपूर्णतः माहिती भरण्यास सुचीत केले आहे. या संदर्भात दि.२.४.२००९ रोजी मा. प्रधान सचिवांनी बैठक आयोजीत केली असून ज्या संस्थेची माहिती EMIS या संगणक प्रणालीवर भरण्यात आलेली नसेल त्या संस्थेच्या प्रमुखांवर जबाबदारी निश्चीत करुन त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येईल अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. करीता आपणास पुनःश्च कळविण्यात येते की, आपले संस्थेची माहिती दिनांक ३०.३.२००९ पर्यंत प्रथम प्राधान्याने भरुन त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहसंचालक तंत्र शिक्षण
अमरावती.

प्रतिलिपीः- मा. संचालक तंत्र शिक्षण, म. रा. मुंबई यांना माहितीकरीता सादर.